परिपत्रक क्र. न्याय/2280 /2024
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय
2 रा मजला, सास्मिरा बिल्डींग,
सास्मिरा रोड, वरळी, मुंबई – 400030
दिनांकः 29 APR 2024

विषयः महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, 1950 चे कलम 36A(3A) बाबत

पहा : 1) मा. उच्च न्यायालय यांचे writ petition No.2922/2023 मधील आदेश दि. 11/03/2024
2) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, 1950 चे कलम 3

**परिपत्रक क्रमांक 607 दिनांक 29/04/2024**

न्यासाने विना परवानगी घेतलेल्या कर्जास कार्योत्तर मंजूरी मिळणेकरीता महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधून महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, 1950 चे कलम 36A(3A) नुसार दाखल होणारी प्रकरणे धर्मादाय आयुक्त यांचे समोर सुनावणीकरीता मुख्यालयात दाखल करुन घेण्यात येत होती. मा. उच्च न्यायालयाने writ petition No.2922/2023 मधील आदेश दि. 11/03/2024 मध्ये कलम 36A(3A) अन्वये दाखल होणाऱ्या प्रकरणांची सुनावणी धर्मादाय सह आयुक्त यांना देखील घेण्याचे अधिकारक्षेत्र आहे, असा निर्वाळा दिला आहे.

तरी, सदर परिपत्रकानुसार सर्व विभागीय कार्यालयांना निर्देशित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, 1950 चे कलम 36A(3A) अन्वये प्रकरणे विभागीय स्तरावर दाखल करुन घेण्यात यावीत आणि सदर प्रकरणे सुनावणीकरीता संबंधित विभागीय धर्मादाय सह आयुक्त यांचे समोर ठेवण्यात यावीत.

(सदर परिपत्रक धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे म.सा.वि.व्य.अधिनियम 1950 चे कलम 3 चे अधिकारानुसार जारी केलेले आहे.)

29/04/24.
(अमोघ कलोती)
धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रतः
1) सर्व धर्मादाय सह आयुक्त
2) सर्व धर्मादाय उप आयुक्त
3) सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
4) कार्यालयीन परिपत्रक धारिणी
5) संगणक शाखा (संकेतस्थळावर अपलोड करणेकरीता)